# प्रेस नोट

## जिल्हा परिषद पदभरती सन 2023-2024 बाबत निवेदन

सातारा जिल्हा परिषदेकडील विविध 21 संवर्गातील 972 पदांसाठी दिनांक 05/08/2023 रोजी जाहिरात प्रसिध्द करणेत आलेली होती. प्रसिध्द करणेत आलेल्या जाहिरातीमध्ये सातारा जिल्हा परिषदेकडे एकूण 74578 इतक्या उमेदवारांचे अर्ज प्राप्त झालेले होते. IBPS कंपनीकडून दिनांक 15 ऑक्टोंबर 2023 पासून On Line पध्दतीने सर्व 21 संवर्गाची परीक्षा विविध परीक्षा केंद्रावर पार पाडणेत आली आहे. तसेच 21 पदांचा On Line परीक्षेचा निकाल IBPS कंपनीकडून प्राप्त झालेला आहे. सर्व 21 संवर्गाच्या परीक्षेची सर्वसाधारण गुणवत्ता यादी जिल्हा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आली आहे. उक्त 21 संवर्गापैकी (वरिष्ठ सहाय्यक (लेखा), कनिष्ठ सहाय्यक (लेखा), आरोग्य पर्यवेक्षक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, विस्तार अधिकारी (सांख्यिकी), विस्तार अधिकारी (कृषि), विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-2, कनिष्ठ सहाय्यक, वरिष्ठ सहाय्यक, कनिष्ठ आरेखक, कनिष्ठ अभियंता (विद्युत), कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, पशुधन पर्यवेक्षक, पर्यवेक्षिका व औषध निर्माण अधिकारी इ. ) 16 संवर्गातील उमेदवारांना जिल्हा परिषदेकडून समोपदेशनाने पदस्थापना व नियुक्ती आदेश निर्गमित करणेत आलेले आहेत. उर्वरीत 5 संवर्गापैकी आरोग्य सेवक (पुरुष) 40% व कंत्राटी ग्रामसेवक अशा 2 संवर्गाच्या उमेदवारांची कागदपत्र पडताळणी पूर्ण झालेली असून उमेदवारांना नियुक्ती आदेश देणे बाबतची कार्यवाही सद्यस्थितीत अंतिम टप्प्यात असून सदरचे नियुक्ती आदेश माहे ऑक्टोंबर-2024 च्या पहिल्या आठवडयात देणेत येत आहे. तसेच कनिष्ठ लेखाधिकारी, आरोग्य सेवक (महिला) व आरोग्य सेवक (पुरुष) 50% अशा 3 संवर्गातील उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी प्रक्रिया पूर्ण झाली आहे तथापी अंतिम निवड यादी बाबत शासन स्तरावरुन मार्गदर्शन मागविणेत आलेले असून याबाबत पाठपुरावा सुरु आहे. शासनस्तरावरुन मार्गदर्शन प्राप्त होताच अंतिम निवड यादी प्रसिध्द करुन पात्र उमेदवारांस त्वरीत नियुक्तीचे आदेश निर्गमित करणेची कार्यवाही करणेत येत आहे.

दिनांक :- 24/09 /2024<br>
स्थळ :- सातारा

**स्वाक्षरी/-**<br>
**याशनी नागराजन** (भा.प्र.से.)<br>
**मुख्य कार्यकारी अधिकारी**<br>
**सातारा जिल्हा परिषद, सातारा**